डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.
कृषी नगर, अकोला - ४४४१०४ (महाराष्ट्र)
अर्थ प्रशासन विभाग,

फोन न. ०७२४-२२५८२६९
ई-मेल : comptroller@pdkv.ac.in

---

जा.क्र.अप्रवि/ कारकिर्द योजना (CAS)/१६२४/२०२२

दिनांक ०६.०१.२०२२
११.०१.२०२२

वाचा :- १. शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागक्रमांक एयुजी-३७११ सी. आर.-४१/३-अे दिनांक १२.०८.२०२१

२. शासन पत्र क. कृषिवि-३७२१/प्र.क्र.१२१२ ६-अे/ दिनांक ०४.१०.२०२१

# परिपत्रक

उपेराक्त संदर्भ क्र. ०१ मध्ये नमुद शासन निर्णयान्वये विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यात आला आहे. या शासन निर्णयातील Illustration नुसार ०१.०१.२०१६ पासुन कारकिर्द प्रगती योजना (CAS) गृहीत धरुन विद्यापीठातील पात्र शिक्षक वर्गीय कर्मचा-यांची वेतन निश्चिती करण्यात आली होती.

तथापी, संदर्भीय पत्र क्रमांक ०२ नुसार शासनाने खालील प्रमाणे विद्यापीठास कळविले आहे.

१. करीअर ॲडव्हॉन्समेंट (CAS) चा उल्लेख मंत्रिमडळ टिप्पणी व प्रस्तावित शासन निर्णयामधुन वगळण्यात यावा, या बाबत नंतर स्वतंत्रपणे निर्ण घेणे योग्य राहील.
२. वित विभागाच्या अभिप्रायानुसार करीअर ॲडव्हॉन्समेंट स्किम (CAS) अनुज्ञेय करणे बाबतचा निर्णय अद्यापी घेण्यात आलेला नाही. त्याबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे शासनास मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे.
३. राज्यातील कृषि विद्यापीठंतील शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना करीअर ॲडव्हॉन्समेंट स्कीम लागु करण्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

संदर्भ क्रमांक ०२ नुसार कॅस लागु करण्या बाबत शासनाचे सुधारीत आदेश प्राप्त होईपर्यत कॅस चा फायदा दिनांक ०१.०१.२०१६ नंतर देय करु नये असा निर्णय विद्यापीठ स्तरावर घेण्यात आलेला आहे.

तरी ज्या आस्थापेनेवरील अधिकारी/कर्मचा-यांनी सातव्या वेतन आयोगातील वेतन निश्चिती कॅस गृहीत धरुन करण्यात आली आहे. अशा अधिकारी/कर्मचा-यांची वेतन निश्चिती कॅस वगळुन सुधारीत करण्यासाठी दिनांक १० जानेवारी ते १४ जानेवारी २०२२ या कालावधीत संबंधित कर्मचा-यांचे सेवापुस्तकासह वेतन निश्चिती प्रस्ताव वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपुर याच्याकडुन मंजुर करुन घ्यावे. या बाबतचची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचीच राहील. माहे जानेवारी २०२२ चे वेतन हे उपरोक्त सुधारणा नुसार करावयाचे असल्याने सदर प्रकरणाला प्रधान्य क्रम देण्यात यावे.

तसेच विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना कॅस लागु करणे बाबत शासनाचे सुधारीत आदेश/निर्देश प्राप्त न झाल्यास कॅस अंतर्गत यापुर्वीच अतिरीक्त प्रदान झालेल्या वेतनाची वसुली बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**मा. कुलगुरु महोदय यांचे मजुंरीने तथा आदेशाऩ्वये निर्गमीत**

नियंत्रक
डॉ.पं.दे.कृवि,अकोला

**प्रतिलिपी,**

१.मा. कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना माहिती करीता सादर.
२. वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपुर पढील कार्यवाहीस रवाना.
३. आहरण व सवितरण अधिकारी ............................................ डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला.
४. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती यंत्रणा कंक्ष यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्या करीता.
५. कुलगुरु यांचे खाजगी सचिव यांना माहिती करीता सादर.